येणाऱ्या सन उत्सवांदरम्यान कायदा आणि सुव्यवस्था राखा >>पान 2

ओला दुष्काळ जाहीर करुन हेक्टरची मर्यादा न लावता १००% नुकसान भरपाई द्या : तुपकर >>पान 3

मेहकरात रेकॉर्डब्रेक भव्य रोजगार मेळावा >>पान 4

**सुविचार**

मेहनत ही यशाची गुरुकिल्ली आहे.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com  मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 31 ■ गुरुवार, दि. 21 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




आदिवी शेषचा डबल धमाका, मृणाल ठाकूर आणि वामिका गब्बीबरोबर करणार स्क्रिन शेअर
आतील पान

# लोकसभेत विरोधकांनी शहांवर कागदी गोळे फेकले

## सरकारने ४ विधेयके सादर केली, विरोधी पक्षाच्या खासदारांनी सर्वांवर चर्चा करण्यास नकार दिला

नवी दिल्ली : गंभीर गुन्हेगारी प्रकरणात अटक झाल्यास पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री किंवा मंत्री यांना पदावरून काढून टाकण्यासाठी केंद्र सरकार कायदा करणार आहे. यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज लोकसभेत ३ विधेयके सादर केली. तिन्ही विधेयकांविरुद्ध लोकसभेत प्रचंड गोंधळ झाला. खासदारांनी तिन्ही विधेयकांच्या प्रती फाडत थेट अमित शाहांच्या अंगावर फेकल्या. त्यामुळे आणखी गदारोळ वाढला. लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी ससंदेचं काम स्थगित केलं.विरोधकांनी तिन्ही विधेयके मागे घेण्याची मागणी केली.



काँग्रेस आणि एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनीही विरोध केला. समाजवादी पक्षाने विधेयकांना न्यायविरोधी, संविधानविरोधी म्हटले. यावर शहा यांनी ही विधेयके संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्याची मागणी केली.

विधेयकांमध्ये जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा मंत्री यांना अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये अटक झाली, ज्यामुळे किमान ५ वर्षांची शिक्षा होऊ शकते आणि त्यांना सलग ३० दिवस कोठडीत ठेवले गेले, तर त्यांना ३१ व्या दिवशी पदावरून काढून टाकले जाईल. दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांनी सहा महिने कोठडी आणि तुरुंगात राहिल्यानंतरही राजीनामा दिला नाही आणि तामिळनाडूचे मंत्री व्ही. सेंथिल बालाजी यांनी ४२१ दिवस कोठडी आणि तुरुंगात राहिल्यानंतरही राजीनामा दिला नाही. केजरीवाल हे पदावर असताना अटक झालेले पहिले मुख्यमंत्री होते.

आता तिन्ही विधेयकांबद्दल जाणून घ्या

१. केंद्रशासित प्रदेश सरकार (सुधारणा) विधेयक २०२५


केंद्र सरकारच्या मते, सध्या केंद्रशासित प्रदेशांमध्ये केंद्रशासित प्रदेश कायदा, १९६३ अंतर्गत गंभीर गुन्हेगारी आरोपांमुळे अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना काढून टाकण्याची तरतूद नाही. म्हणून, अशा प्रकरणांमध्ये मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना काढून टाकण्यासाठी कायदेशीर चौकट तयार करण्यासाठी केंद्रशासित प्रदेश कायदा, १९६३ च्या कलम ४५ मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

२. १३० वे संविधान दुरुस्ती विधेयक २०२५

केंद्राने या विधेयकाबद्दल म्हटले आहे की गंभीर गुन्हेगारी आरोपांमुळे अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मंत्र्याला काढून टाकण्याची संविधानात कोणतीही तरतूद नाही. म्हणून, अशा प्रकरणांमध्ये, पंतप्रधान किंवा केंद्रीय मंत्रिमंडळातील कोणत्याही मंत्र्यांना आणि राज्यांच्या किंवा राष्ट्रीय राजधानी प्रदेशाच्या मंत्रिमंडळातील कोणत्याही मंत्र्यांना किंवा मुख्यमंत्री किंवा कोणत्याही मंत्र्यांना काढून टाकण्यासाठी कायदेशीर चौकट तयार करण्यासाठी संविधानाच्या कलम ७५, १६४ आणि २३९-- मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

३. जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन (सुधारणा) विधेयक २०२५

जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन कायदा, २०१९अंतर्गत, गंभीर गुन्हेगारी आरोपांमुळे अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना काढून टाकण्याची कोणतीही तरतूद नाही. जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन कायदा, २०१९ च्या कलम ५४ मध्ये सुधारणा केल्यानंतर, गंभीर गुन्हेगारी प्रकरणात अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना ३० दिवसांच्या आत काढून टाकण्याची तरतूद असेल.



# पोलीस भरतीची तयारी करणाऱ्यांसाठी गुड न्यूज

## १५६३१ जागांच्या भरतीचा शासन निर्णय प्रसिद्ध, परीक्षा शुल्क ठरलं

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळानं १२ ऑगस्टच्या बैठकीत १५६३१ पदांची पोलीस भरती करण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयानुसार गृह विभागानं १५६३१ जागांवर पोलीस शिपाई भरती करण्याचा निर्णय घेतण्यात आला आहे. महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई आणि कारागृह विभागातील कारागृह शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी राबविण्यात येणा-या भरती प्रक्रियेस मान्यता देणारा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई तसच कारागृह विभागातील कारागृह शिपाई संवर्गातील दि.१ जानेवारी २०२४ ते दि ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत रिक्त झालेली आणि शासन निर्णय क्रमांकः पोलीस-११२५/प्र.क.१७३/पोल-५अ, दिनांक २० ऑगस्ट, २०२५ दि.०१ जानेवारी २०२५ ते दि ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत रिक्त होणारी १५६३१ पदे भरतीकरीता उपलब्ध होणार आहेत.

पदनाम : रिक्त पदांची संख्या

१. पोलीस शिपाई : १२३९९, २.पोलीस शिपाई चालक : २३४, ३. बॅण्डस्मन : २५, ४ सशस्त्र पोलीस शिपाई : २३९३, ५ कारागृह शिपाई : ५८०, एकूण १५६३१.

शासन निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ४ मे २०२२ आणि २१ नोव्हेंबर २०२२ च्या शासन निर्णयातील तरतूदींमधून शिथिलता देऊन पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५ ची भरती प्रक्रिया घटकस्तरावरुन राबविण्यास तसेच जचठ आधारीत लेखी परीक्षा घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सन २०२२ व सन २०२३मध्ये संबंधित पदाची विहित कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना एक वेळची विशेष बाब म्हणून प्रस्तुत भरती प्रक्रियेकरीता आवेदन अर्ज सादर करण्यास पात्र ठरविण्यात आलं आहे.

या भरती प्रकियेसाठीही या पूर्वीच्या पोलीस शिपाई भरतीप्रमाणेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.४५०/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.३५०/- इतके परीक्षा शुल्क आकारण्यास तसेच परीक्षा शुल्क स्वरुपात जमा झालेली रक्कम आवश्यकतेनुसार भरती प्रक्रियेकरीता खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्रात लाखो तरुण आणि तरुणी पोलीस भरतीची तयारी करत असतात. राज्य सरकारनं २०२४ आणि २०२५ मधील रिक्त जागा मिळून १५६३१ जागांवर पोलीस शिपाई भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील शासन निर्णय जारी झाल्यानं पोलीस भरतीची तयारी करणाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारनं आज जीआर प्रसिद्ध केला असून या मध्ये भरतीची प्रक्रिया, राबवण्यासंदर्भात देखील सूचना देण्यात आल्या आहेत. पोलीस भरती संदर्भातील गृह विभागाचा शासन निर्णय प्रसिद्ध झाल्यानं आता पोलीस शिपाई भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. येत्या काही दिवसांमध्ये या संदर्भातील प्रक्रिया सुरु होईल.

## शनिशिंगणापूर प्रशासनाचा मोठा निर्णय, शनी अमावस्येला चौथऱ्यावर जाण्यास भाविकांना प्रवेशबंदी

**अहिल्यानगर/प्रतिनिधी:** शनिशिंगणापूर येथील शनिदेव मंदिरात दरवर्षी शनी अमावास्येला लाखो भाविक दर्शनासाठी दाखल होतात. देश-विदेशातून मोठ्या संख्येने शनीभक्त येथे येऊन शनिमूर्तीचे दर्शन घेतात आणि तेलाभिषेक करून मनोभावे पूजा-अर्चा करतात. मात्र यंदा अपेक्षित असलेल्या प्रचंड गर्दीच्या पार्श्र्वभूमीवर शनिशिंगणापूर देवस्थान प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शनिअमावास्येच्या दिवशी शनिचौथऱ्यावर भाविकांना प्रवेशबंदी घालण्यात आली आहे.

शनिअमावास्येला येत्या शनिवारी शनिशिंगणापूर येथील शनिचौथऱ्यावर जाऊन भाविकांना दर्शन घेता येणार नाही...भाविकांच्या सुरक्षेसह गर्दीच्या पार्श्र्वभूमीवर शनिचौथऱ्यावर भाविकांना प्रवेश बंदी असणार आहे...शनिअमावास्येनिमित्त देश विदेशातून लाखो शनीभक्त शनिशिंगणापुरात दर्शनासाठी दाखल होतात... यावेळी शनिचौथऱ्यावर जाऊन भाविक स्वतः शनिमूर्तीला तेलाभिषेक करतात... मात्र यंदा प्रचंड गर्दी अपेक्षित असल्याने भाविकांचे दर्शन सुरळीत आणि शांततेत पार पाडण्यासाठी २२ ऑगस्टच्या मध्यरात्री महाआरतीपासून ते २३ ऑगस्टपर्यंत शनिचौथ्यावर दर्शन आणि तेलाभिषेक बंद ठेवण्यात येणार आहेत.

शनिवार पेठेतील ओंकारेश्र्वर मंदिर मुठा नदीच्या पाण्याखाली गेले आहे. खडकवासला धरणातून सध्या मुठा नदीत तब्बल ४० हजार क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग केला जात आहे. त्यामुळे मुठा नदी दुथडी भरून वाहत असून पाणी मंदिराच्या परिसरात शिरले आहे. भाविकांसाठी मंदिर तात्पुरते बंद करण्यात आले आहे.

मंदिराच्या आत जवळपास पाच फूट पाणी साचले असून पायऱ्यांपैकी पाच पायऱ्या पूर्णपणे पाण्याखाली गेल्या आहेत. पूर्वी ६५ ते ७० हजार क्युसेक्स पाणी सोडल्यानंतरही मंदिरात पाणी शिरत नसे. मात्र, सध्या मेट्रो प्रकल्पाचे काम झाल्यानंतर फक्त ४० हजार क्युसेक्स विसर्गातच पाणी मंदिराच्या पायऱ्यांपर्यंत पोहोचले आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करून अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्या

## राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांची जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे मागणी




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी::** जिल्ह्यात गत काही दिवसात झालेल्या अतिवृष्टीने पिकांची प्रचंड नुकसान झाली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून बाधित शेतकऱ्यांना अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयाची तात्काळ मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे पाटील यांच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात नमूद केले आहे की, जिल्ह्यामध्ये अनेक भागात गत काही दिवसात अतिवृष्टी झाली आहे. यामध्ये प्रामुख्याने डोणगाव, मेहकर, लोणार, जानेफळ, चिखली तसेच संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे ओला दुष्काळ जाहीर करून बाधित शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी ५० हजार रुपयाची भरीव, अशी आर्थिक मदत जाहीर करावी. कृषीप्रधान भारत देशाचा कणा असलेला बळीराजाला कठीण परिस्थितीत साथ देण्यासाठी राज्य सरकारने ओला दुष्काळ जाहीर करून लवकरात लवकर सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी बुलढाणा राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाप्रमुख गोपाल सुभाषराव आखाडे यांच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# राज्य महोत्सवांतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन

## अधिकाधिक मंडळांनी सहभागी होण्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्यात साजरा होणारा गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री अँड. आशिष शेलार यांनी केली. या महोत्सवांतर्गत, महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राज्य, जिल्हा, तालुका या तीनहीस्तरांवर होणार आहे. या स्पर्धेचे अर्ज पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबईच्या pldeshpandekalaacademy.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या saneshotsav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे ऑनलाइन स्वरूपात स्वीकारले जाणार आहेत. स्पर्धेचे अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट २०२५ असून, ही स्पर्धा विनामूल्य आहे.



नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

विजेत्या मंडळांना तालुकास्तरावर एक, जिल्हा व राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांनी गौरविले जाणार आहे. यासोबतच, महाराष्ट्रातील घरगुती गणपतीचे दर्शन, सार्वजनिक गणपतीचे दर्शन व विविध प्रसिद्ध गणेश मंदिरातील गणपतींचे लाईव्ह दर्शन अकादमीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या ganeshotsav.pldmka.co.in पोर्टलद्वारे घरबसल्या घेता येणार आहे. आपल्या घरगुती अथवा सार्वजनिक गणेशोत्सवाचे छायाचित्र या पोर्टलद्वारे विनामूल्य प्रसिद्ध करता येईल. याकरिता अधिकाधिक मंडळांनी व कुटुंबांनी आपल्या गणपतीची छायाचित्रे ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे प्रसिद्ध करावी व सर्वांना श्री गणरायाचे दर्शन घेता यावे असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री अँड. आशिष शेलार यांनी केले आहे.

विविध स्पर्धा, सांस्कृतिक उपक्रम, गड किल्ले संवर्धन, राज्य व राष्ट्रीय स्मारकांचे जतन, विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन, देशी खेळांचे संवर्धन व प्रचार प्रसार, आरोग्य शिक्षण कला क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध विषयांवरील कार्य, कायमस्वरूपी सामाजिक व शैक्षणिक उपक्रम, वाचनालय, महिला सक्षमीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाच्या विज्ञानाच्या प्रचार व प्रसिद्धीचे कार्य, नवसंशोधन, पर्यावरण पूरक मूर्ती, सजावट व प्रदूषण रहित वातावरण अशा विविध बाबींच्या आधारे परीक्षण केले जाणार आहे.

या गणेशोत्सव स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री अँड. आशिष शेलार यांनी केले आहे

## आशिया करंडकासाठी संतुलित संघ निवड

पुढील महिन्यात ९ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत दुबई येथे टी २० सामन्यांची आशिया करंडक स्पर्धा होणार असून या स्पर्धेसाठी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी १९ तारखेला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. आशिया करंडक स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज सूर्यकुमार यादव हा करेल तर कसोटीतील भारतीय संघाचा युवा कर्णधार शुभमन गिल हा या संघाचा उपकर्णधार आहे. या भारतीय संघाच्या डावाची सुरुवात संजू सॅमसन व युवा अभिषेक शर्मा हे करतील. संजू अनुभवी तर अभिषेक युवा खेळाडू आहे. संजू आणि अभिषेक हे भारताचे अनुभवी आणि युवा खेळाडू भारताच्या डावाची धडेकबाज सुरवात करतील यात शंका नाही. यांच्यासोबत तिसरा सलामीवीर म्हणून शुभमन गिलची निवड करण्यात आलेली आहे. शुभमन गिल तिसऱ्या क्रमांकावरही खेळू शकतो. मधल्या फळीची जबाबदारी कर्णधार सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा आणि रिंकू सिंग यांच्यावर आहे. संजू सॅमसन हा सलामीवर यष्टिरक्षणही करेल. तो भारताच्या पहिल्या पसंतीचा यष्टिरक्षक आहे. जितेश शर्मा याची अतिरिक्त यष्टीरक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे तो उत्तम फिनिशर म्हणूनही आपली जबाबदारी पाडू शकेल. भारताची फलंदाजी अतिशय बलवान असून संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल हे पहिल्या तीन क्रमांकाचे फलंदाज जगातील सर्वोत्तम फलंदाज मानले जातात. टी २० सामन्यात या तिघांची कामगिरी उत्तम असून तिघेही टी २० सामन्यातील श्रेष्ठ फलंदाज समजले जातात. स्थानिक क्रिकेट असो की आयपीएल किंवा आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेट या तिघांची कामगिरी त्यांच्या लैकिकास साजेशी झालेली आहे त्यामुळे त्यांच्या निवडीवर कोणीही प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकत नाही. त्यांची निवड भारतासाठी सुचिन्ह आहे त्यांनी जर चांगली सुरुवात केली तर भारताचे निम्मे काम फत्ते होईल. टी २० सामन्यात धडाकेबाज सुरुवात होणे महत्वाची आहे आणि हे तिघेही धडाकेबाज खेळीसाठी प्रसिद्ध आहे. चौथ्या क्रमांकावर युवा तिलक वर्मा येईल तो भारताचा भरवशाचा फलंदाज असून मिळालेल्या संधीचे सोने कसे करायचे हे त्याला चांगले ठाऊक आहे. तो फ्लॉप गेला तर त्याची जागा रिंकू सिंग घेईल. तो मैदानात सर्वत्र फटकेबाजी करू शकतो. तोही भारताचा भरवशाचा फलंदाज मानला जातो. त्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव हा धडाकेबाज फलंदाज मैदानात येईल. तो स्फोटक फलंदाज असून मॅच फिनिशर आहेत. कमी चेंडूत जास्त धावा काढून संघाला विजय मिळवून देण्यात त्याचा हातखंडा आहे. त्यानंतर हार्दिक पांड्या हा जगातील सध्याचा सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू येईल. तो गोलंदाजी, तडाखेबंद फलंदाजी आणि प्रभावी क्षेत्ररक्षण करून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावतो. त्याने आपल्या अष्टपैलू खेळीने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. शिवम दुबे हा आणखी एक अष्टपैलू खेळाडू भारतीय संघात आहे. मध्यमगती गोलंदाजी आणि तडाखेबंद फलंदाजी हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. गोलंदाजीमध्ये निवड समितीने तीन फिरकी गोलंदाजांना संधी दिली असून अनुभवी अक्षर पटेल सोबत फॉर्मात असलेला चायनामन गोलंदाज कुलदीप यादव आणि ऑफ स्पिनर वरुण चक्रवर्ती यांना संधी मिळाली आहे. कुलदीप आणि अक्षर दोघेही डावखुरे मंदगती गोलंदाज आहेत मात्र त्यांच्यात विविधता आहे. अक्षर पटेल अर्थोडॉक्स स्पिनर आहे तर कुलदीप चायनमन गोलंदाज आहे त्यामुळे जरी ते डावखुरे असले तरी त्यांच्यात विविधता आहे. आणि दोघेही चांगल्या फॉर्ममध्ये आहे अक्षर पटेल हा भारताचा सर्वोत्तम मंदगती गोलंदाज आहे शिवाय तो फलंदाजीही करतो आणि चांगला क्षेत्ररक्षक आहे म्हणजे तो एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आहे. वरुण चक्रवर्ती हा मिस्ट्री गोलंदाज भारतीय संघात आहे. त्यांची ऑफस्पिन भल्या भल्या फलंदाजाला बुचकळ्यात टाकते. तो जबरदस्त फॉर्मात आहे. भारताला चॅम्पियन ट्रॉफी जिंकून देण्यात त्याचे मोलाचे योगदान होते. आताही त्याने तसेच योगदान दिले तर भारत आशिया करंडकावर पुन्हा एकदा नाव कोरू शकतो. जसप्रीत बुमराह व अर्शदीप सिंग या अनुभवी वेगवान गोलंदाजांसोबत हर्षित राणा या युवा गोलंदाजाला देखील निवड समितीने संधी दिली आहे. निवड समितीने अर्शदीप सिंग या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला संधी देऊन वेगवान गोलंदाजीत विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे. मर्यादित षटकांच्या सामन्यात डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाचे महत्व अनन्यसाधारण आहे. २०११ साली झहीर खान या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने अप्रतिम कामगिरी करून भारताला विश्वचषक मिळवून दिला होता इतकेच नाही तर मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेत अर्शदीप सिंगनेच सर्वाधिक बळी मिळवले होते. डावाच्या शेवटी म्हणजे डेथ ओव्हरमध्ये अर्शदिप सिंगची गोलंदाजी प्रभावी ठरते. निवड समितीने निवडलेला हा संघ चांगला आहे. जुन्या आणि नव्या खेळाडूंना संधी देत जोश आणि होश यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही ठरले आहेत. श्रेयस अय्यर, यशस्वी जयस्वाल आणि मोहम्मद सिराज या अनुभवी खेळाडूंची निवड न झाल्याचे दुःखही आहे मात्र निवड समिती फक्त पंधरा सदस्यांचा संघ निवडू शकते त्यामुळे इच्छा असूनही निवड समितीला या खेळाडूंना या संघात निवडता आले नसेल मात्र भविष्यात त्यांना नक्की संधी मिळेल त्यामुळे त्यांनी नाउमेद होऊ नये. आशिया करंडकासाठी निवडण्यात आलेला हा संघ संतुलित आहे हे मान्य करून नीवड समितीचे याबाबत अभिनंदन करावे लागेल. आता जबाबदारी आहे ती निवडण्यात आलेल्या या १५ खेळाडूंची. या १५ खेळाडूंनी आपल्याला मिळालेल्या संधीचे सोने करून आशिया करंडकावर पुन्हा भारताचे कोरावे. आशिया करंडकावर भारताचे नाव कोरण्यासाठी हे खेळाडू जीवाचे रान करतील आणि १४५ कोटी भारतीयांना आशिया करंडक जिंकून देतील यात शंका नाही. या स्पर्धे साठी निवड झालेले सर्व खेळाडू अनुभवी आहेत. टी २० सामने खेळण्याचा सर्वांना मोठा अनुभव आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ही स्पर्धा दुबईत होणार आहे. संघात निवड झालेल्या सर्व खेळाडूंना दुबईत खेळण्याचा चांगला अनुभव आहे त्यामुळे देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करून भारताला पुन्हा एकदा आशिया करंडक जिंकून देण्याची जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील अशी आशा करूया. भारतीय संघाला टी २० आशिया करंडक स्पर्धेसाठी मनापासून शुभेच्छा!

# येणाऱ्या सन उत्सवांदरम्यान कायदा आणि सुव्यवस्था राखा

## भारत मुक्ती मोर्चासह अठरापगड जातीय संघटनांचे ठाणेदारांना निवेदन

**दैनिक आपला विदर्भ**

**उमरखेड /प्रतिनिधी:** भारत मुक्ती मोर्चा ही भारतातील ३१ राज्ये आणि ६५० जिल्ह्यांमध्ये काम करणारी एक राष्ट्रव्यापी सामाजिक संघटना आहे, जी संविधानाने परिकल्पित केलेल्या समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायावर आधारित समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असते.त्यांनी अठरापगड जातीतिल विविध १० संघटनांच्या माध्यमातून भारत मुक्ती मोर्चाच्या नेतृत्वात आज निवेदन दिले.

ज्यात ढाणकी येथे गणेश उत्सव व इतरही सर्व सामाजिक धार्मिक उत्सवांदरम्यान शांतता आणि सांप्रदायिक सलोखा राखण्याच्या संविधानिक मागण्या पोलीस स्टेशन बिटरगाव ठाणेदार पांडुरंग शिंदे यांच्या समोर मांडल्या आहेत. प्रमुख मागण्यांमध्ये हे समाविष्ट आहे,गेल्या वर्षी गणेश विसर्जन वेळी उमरखेड तालुक्यातील ढाणकी परिसरात असामाजिक घटकांमुळे दंगलीच्या घटना घडल्या, ज्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था बिघडली आणि सामाजिक सौहार्दाला मोठे नुकसान झाले.त्यामुळे यावेळेस सुरक्षा उपाययोजना वाढवन्यासाठी संवेदनशील भागात, विशेषतः गणेश उत्सवादरम्यान, पोलिसांची उपस्थिती आणि सीसीटीव्ही देखरेख वाढवून दहा दिवस सतत व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे.विघटनकारी घटकांविरुद्ध कारवाई,शांतता आणि सौहार्द समितीची स्थापना करणे यात संविधानातील निर्मित नागरी प्रवर्गातील सर्व समाजाचे २५% प्रमाणात लोक समाविष्ट करणे,मिरवणुकांचे नियमनाचे पालन होत आहे का याचे निरक्षण करणे, मिरवणुकांसाठी नियुक्त केलेल्या मार्गांचे पालन करणे आणि कमी आवाज पातळी राखणे यावर भर देणे.सर्व धर्मीय बांधवांच्या प्रार्थना स्थळाच्या ठिकाणी विशेष सुरक्षा बंदोबस्त तैनात करावा. पोलिस प्रशासनाने सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये वाजणारी गाणी, पोस्टर्स किंवा सोशल मीडियाद्वारे जातीय तेढ पसरवण्यापासून असामाजिक तत्व आढळल्यास रोखावे आणि फुटीरतावादी मजकूर पोस्ट करणाऱ्यांवर त्वरित कारवाई करावी.

कोणत्याही राजकीय दबावात न येता संविधानाच्या प्रभावात प्रशासनाने कार्य करावे.कायद्याचे निष्पक्षपणे काम करावे आणि संवैधानिक तत्त्वांचे पालन करून कोणत्याही विशिष्ट धार्मिक व्यक्तींना लक्ष्य करू नये.उत्सव प्रतिष्ठापना आणि विसर्जनाच्या दिवशी पूर्णवेळ वीजपुरवठा सुनिश्चित केला पाहिजे.




भारत मुक्ती मोर्चाच्या नेतृत्वात चक्रधर पाटील देवसरकर, प्रकाश कांबळे, समाधान पंडागळे, इंदल राठोड, कृष्ण पाटिल, दिगंबर कदम,प्रल्हाद मेंढके, बाजीराव गायकवाड, संजय बनसोडे अनिल लहाने, पुंडलिक तलवारे, मिलिंद चिकाटे, राजू हनवते, जयशील कांबळे, शुभम खंदारे, गणपत गव्हाळे, सुनील भोने, बबलू चव्हाण,यांसह अठरापगड जातीतील छत्रपती क्रांती सेना, राष्ट्रीय किसान मोर्चा ,लहुजी क्रांती मोर्चा, बुद्धीस्ट इंटरनॅशनल नेटवर्क, राष्ट्रीय गोर बंजारा क्रांति संघ, राष्ट्रीय ओबीसी मोर्चा, भारतीय विद्यार्थी, बेरोजगार मोर्चा अशा विविध संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.अठरापगड जातींनी एकत्र येऊन दिलेल्या सदर निवेदनाची सर्वत्र चर्चा होताना दिसत आहे.

# महात्मा फुले उच्च प्राथमिक विद्यालयाची विद्यार्थी पर्यावरण दिंडी, तरूण भारत मंदीर स्वच्छता तुळस लावा पर्यावरण वाचवा अभियान

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

**लोणार :** तरूण भारत शतकी वर्ष श्री नरकेसरी प्रकाशन अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मंदिर स्वच्छता अभियान तुळस लावा पर्यावरण वाचवा उपक्रमाद्वारे दि. १९ ऑगस्ट रोजी १२ वाजता बुलढाणा येथील महात्मा फुले उच्च प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची शाळेपासून तुळस दिंडी काढण्यात आली. याप्रसंगी तुळस लावा पर्यावरण जागवा असा जयघोष करण्यात आला तानाजी नगरातील हनुमान मंदिरात स्वच्छता अभियान व तुळस रोपण करण्यात आले.



याप्रसंगी भागवत वारकरी संप्रदाय तसेच महिला वारकरी भजनी मंडळाच्या वतीने मंदिर परिसरात तुळस रोपण करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त वैज्ञानिक अधिकारी मनोहर हिंगे यांनी तुळशीचे धार्मिक, आरोग्यदायी, पर्यावरणपूरक ऑक्सीजन देणारे बहुगुणी असल्याचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. कर्करोगा सारखा दुर्धर आजार सुद्धा बरा होतो. असे त्यांची आर्वजून सांगितले. या उपक्रमात शाळेचे शिक्षक मोहन नायकुजी, संजय मानतकर, योगेश साळोख, मनिषा चौतमोल, अक्षरा देशमुख, भागवत वारकरी संप्रदायचे गंगाराम गव्हाळे, प्रतापसिंग राजपूत, सुखदेव पवार, रामभाऊ भोपळे, आत्मराम चौतमोल, आनंदाराव मानतकर, वारकरी महिला मंडळाच्या गुंफाबाई गव्हाळे, सुमन राजपूत, श्रीमती यवतकर, श्रीमती नागरे, श्रीमती हिंगे, डॉ. छाया वानखडे, महानंदा चौतमोल, रेखा चव्हाण, संगीता भंडारे, मनीषा वाघमारे रंजना सपकाळ, पल्लवी भंडारे, सिमा लोखंडे, वंदना पाटील, कौशल्या गवई, श्रीमती ठाकरे, सुमती शिरसाट, बिज अंकुरेच्या संयोजिका वैशाली शिरसाट, दै. तरूण भारतचे जिल्हा प्रतिनिधी नितीन शिरसाट, संगणक परीचालक तुषार यंगड तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदिवी शेषचा डबल धमाका, मृणाल ठाकूर आणि वामिका गब्बीबरोबर करणार स्क्रिन शेअर

**मुंबई /प्रतिनिधी:** अभिनेता आदिवी शेष या अभिनेत्यानं आपल्या अभिनयानं प्रेक्षकाचं खूप कमी काळात मनं जिंकलं आहे. आता हा साऊथ स्टार दोन मोठ्या प्रकल्पांसह प्रेक्षकांसमोर येणार आहे. हे दोन्ही चित्रपट वेगवेगळ्या शैलीतील असणार आहेत. पहिला हिंदी चित्रपट डॅकॉइट आहे, जो ॲक्शन-थ्रिलर आणि प्रेमकथेवर आधारित आहे. या चित्रपटात, आदिवी मृणाल ठाकूरसोबत दिसणार आहे. डॅकॉइट चित्रपट २०२५ च्या ख्रिसमसला प्रदर्शित होणार आहे. यानंतर, त्याचा जी२ - गुडाचरी २ येणार आहे, जो त्याच्या कल्ट स्पाय-थ्रिलर गुडाचरीचा सीक्वेल आहे. हा चित्रपट १ मे २०२६ रोजी रिलीज होणार आहे. या चित्रपटात तो वामिका गब्बी देखील एका दमदार व्यक्तिरेखेत दिसणार आहे.

आदिवी शेषचे आगामी चित्रपट : या दोन्ही चित्रपटांद्वारे,आदिवी शेष राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख मजबूत करणार आहे. विशेष म्हणजे हे चित्रपट हिंदी आणि तेलुगूमध्ये एकाच वेळी चित्रित होईल, जेणेकरून प्रत्येक भाषेतील आणि प्रदेशातील प्रेक्षक त्यांच्याशी जोडले जाऊ शकतील. दरम्यान आदिवी शेषनं आपल्या प्रवासाबद्दल म्हटलं, ‘‘मी नेहमीच असे मानतो की, चांगला सिनेमा भाषेच्या सीमा ओलांडतो. डकॉइट आणि जी२सह, मला फक्त मोठ्या प्रमाणात चित्रपटच नाही, तर चांगल्या गोष्टी देखील करायच्या आहेत. डकॉइट हा एक भावनिक ॲक्शन-थ्रिलर आहे, जो प्रेम आणि तळमळाची कथा सांगतो, तर जी२ हा एक मोठा गुप्तहेर-साहस आहे, जो गुडाचारीच्या जगाला पुढे घेऊन जातो. दोन्ही चित्रपटांचा प्रकार आणि भाषा वेगळी असू शकते, परंतु जागतिक दृष्टी आणि भावनांच्या खोलीसह भारतीय कथा दाखवण्याचा खरा प्रयत्न आहे.‘‘

आदिवी शेष आपल्या भावना व्यक्त केल्या : यानंतर आदिवी शेषनं पुढं सांगितलं, ‘‘मृणाल आणि वामिका सारख्या प्रतिभावान अभिनेत्रींबरोबर काम करणे आणि इतके मोठे स्वप्न पाहणाऱ्या टीममध्ये सामील होणं हे रोमांचक आणि आव्हानात्मक दोन्ही आहे. मला वाटतं की, आता भारतीय चित्रपटांनी कोणाच्याही मान्यतेची वाट पाहू नये, आपण आपल्या कथा जगाला आपल्या शैलीत सांगितल्या पाहिजेत आणि मला आनंद आहे की, मी या बदलाचा एक भाग आहे.‘‘ आता आदिवी शेषचा हा चित्रपट पाहण्यासाठी अनेकजण आतुर आहेत.

# रिसोड तालुक्यातील शेतकरी धडकले तहसील कार्यालयावर, निवेदनाद्वारे मदतीची मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी:** तालुक्यात १४ ऑगस्ट पासून होत असल्यास अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेतातील पिके सिंचन साहित्यासह शेतातील माती ही वाहून गेली आहे त्यामुळे शेतकऱ्यांचे कधी न भरून निघणारे नुकसान झाले आहे त्यामुळे सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावी व कर्जमाफी करावी अशी मागणी तहसीलदारामार्फत जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे की १४ ऑगस्ट पासून तर आज पर्यंत तालुक्यात सतत ढगफुटी सदृश्य पाऊस व संत धार सुरु असुन त्यामुळे नदी नाले पूर्ण क्षमतेने वाहत असल्यामुळे व संततधार पाऊस सुरु असल्यामुळे शेत पिकाचे संपूर्ण नुकसान झालेले असुन पुराच्या पाण्यामुळे सिंचनाचे वाहुन गेले आहे रिसोड तालुक्यातील काही महसूल मंडळ तांत्रीक निकषात बसत आहे, व काही महसुल मंडळे उदा .कवठा, रिठद, गोवर्धन ईत्यादी मंडळे अतिवृष्टीच्या व संततधार पावसाच्या तांत्रीक निकषात बसत नसल्याची माहिती महसूल विभागाकडून मिळत आहे.व त्याबाबत शेतकऱ्यांमध्ये चर्चा होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तिव्र नाराजी व अस्वस्थता पसरली आहे या तिन्ही महसुली मंडळातील शेतकऱ्यांनी आपले निवेदन रिसोड तहसीलदार यांचे मार्फत जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस मॅडम वाशिम व वाशिम जिल्हा पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांना दिले आहे यावर्षी खरिपाच्या सुरुवातीपासूनच शेतकरी बिकट परिस्थितीत अडकला आहे महसुली विभागाने जी परिस्थिती कागदावर दाखवली ती चुकीची आहे.परंतु प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे सदर मंडळामध्ये शेतकऱ्यांचे संपूर्ण शेत पिकांचे नुकसान झाले असून उभ्या असलेल्या पिकावर बुरशी जन्य रोगाचा मोठ्या प्रमाणात




रिसोड- निवेदन देताना मोहजा इंगोले भोकरखेड व वाडी रायताळ येथील शेतकरी

प्रार्दुभाव वाढला आहे व त्यामुळे उर्वरित पिके शेतकऱ्यांच्या हातातुन जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे तसेच शेत रस्ते सुध्दा खरडुन गेले आहे व घरांची सुध्दा मोठया प्रमाणात पडझड झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घेतलेले पिक कर्ज भरणे शक्य नाही. त्यामुळे संपूर्ण पिक कर्ज माफी करून अतिवृष्टी व संततधार पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना सरसकट भरीव मदत जाहिर करावी अन्यथा वंचीत राहणारे सर्व शेतकरी शासना च्या विरोधात तिव्र आंदोलन करतील याची प्रशासनाने नोंद घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे.

सदर निवेदनावर घनश्याम मापारी, नारायण आरु, महादेव लांडगे, लक्ष्मण हागे,कैलास पाटील लांडगे, महादेव ढगे, शंकर लांडगे, सतीश इंगोले, नारायण इंगोले, रामा कलापाड, भागवत रंजवे, संतोष रंजवे, रामेश्वर रंजवे, पुरुषोत्तम रंजवे, शिवाजी सोनुने यांच्यासह मोहजा इंगोले, भोकरखेड, वाडी रायताळ येथील शेकडो शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### सय्यदपूर येथील नदीवरील पूल वाहून गेल्याने दोन गावांचा संपर्क तुटला, नागरिकांचे हाल

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** गेल्या आठ दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये पाऊस सुरू असून अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी पिकांचे नुकसान झाले आहे. छत्रपती संभाजी नगर तालुक्यातील मौजे, सय्यदपूर, मुरूमखेडा येथे मुसळधार पावसामुळे व अतिवृष्टीमुळे दोन गावाला जोडणारा पूल हा अक्षरशः वाहून गेला. गावातील ग्रामस्थांनी प्लास्टिक पाईप ठेवून त्यावर लाकडी फळी ठेवत शालेय विद्यार्थी व नागरिकांना ये-जा करण्यासाठी तात्पुरता रस्ते केला. हा रस्ता दोन गावाला जोडणारा रस्ता आहे. या संदर्भात माजी सभापती यांनी आज खासदार कल्याण काळे यांना निवेदन देखील दिले आहे. सय्यदपूर येथील दुधना नदीवरील पर्यायी पूल मुसळधार पावसामुळे वाहून गेल्यामुळे नागरिकांना व विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी पर्यायी रस्ता करून पुलाचे काम तात्काळ सुरू करावे, अशी मागणी नागरिकांनी केली.

### पुण्यात पावसाचा जोर वाढला, भिडे पूल वाहतुकीसाठी बंद, रेड अलर्ट जारी

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी:** गेल्या तीन दिवसापासून पुणे जिल्ह्यात सततच्या मुसळधार पावसामुळे रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढल्याने मुठा नदी दुथडी भरून वाहत आहे. भिडे पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला असून अनेक रस्ते पाण्याखाली गेले आहेत.

प्रशासन व एनडीआरएफ पथके सज्ज असून नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आलं आहे. एकता नगर परिसर पाण्याखाली गेला असून अनेक सोसायट्या आणि घरांमध्ये कमरेपर्यंत पाणी शिरले आहे. अचानक आलेल्या पाण्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रस्ते जलमय झाल्याने प्रशासनाने नागरिकांना घराबाहेर पडताना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

भिडे पूलही पाण्याच्या प्रवाहात धोक्याच्या स्थितीत आल्याने वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. यामुळे जुन्या पुण्यातून जाणाऱ्या वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत आहे. घाटम ाथ्यावर मोठ्या प्रमाणावर पाऊस सुरू असल्याने नद्या, नाले ओसंडून वाहत आहेत. पायाभूत सुविधा विस्कळीत झाल्याने शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले आहे.

एनडीआरएफची पथकेही पुण्यात सज्ज ठेवण्यात आली आहेत. गरज असल्यास नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याची तयारी करण्यात आली आहे. विशेषत: मुठा, मुळा व पवना नदी पात्रातील नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, पुढील काही तासांत पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुणेकरांनी गरज असेल तरच बाहेर पडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ऐन पावसात ॲप बेस्ड कॅब सेवांनी केली प्रवाशांची लूट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** मुसळधार पावसामुळे मंगळवारी रेल्वे सेवा पुरती कोलमडली होती. ठिकठिकाणी बेस्टच्या बस पाण्यात अडकल्या होत्या. या परिस्थितीत काही नागरिकांनी प्रवासाचा सुरक्षित पर्याय म्हणून ॲप बेस्ड कॅब सेवा वापरण्याचा निर्णय घेतला. पण या गरजू प्रवाशांना कंपन्यांनी लुबाडल्याची बाब समोर आली आहे. अनेक प्रवाशांनी सोशल मीडियाद्वारे या संदर्भात नाराजी व्यक्त केली आहे. प्रवाशांच्या अडचणीचा गैरफायदा घेत हजारो रुपयांचे भाडे ॲप बेस्ड कॅब सेवा देणाऱ्या कंपन्यांनी आकारले होते. कल्याण ते सीएसएमटी / चर्चगेटसाठी २,४०० रुपये आणि सीएसएमटी ते ठाणेसाठी १,५०० रुपयांची आकारण्याचे प्रकार घडले. यामुळे पावसाने त्रासलेल्या नागरिकांना सुरक्षित प्रवासाकरिता खिसा रिकामा करण्याची वेळ आली होती. मिठी नदीला आलेल्या पुरामुळे कुर्ला डेपो परिसरात आणि एलबीएस रस्त्यावर पाणी साचले होते. याम ुळे अनेक वाहने अडकली होतो. अंधेरी, कुर्ला घाटकोपर रोड मरोळ नाका, बीपीटी रोडवरील कॉटन फाटक परिसरात दोन फूट पाणी साचले होते. पेडर रोड, महालक्ष्मी मंदिर आणि ताडदेव परीसरात दिड फूट पाणी साचले होते. यामुळे रस्ते वाहतूक बंद होती. रेल्वे सेवा पुरती कोलमडली होती त्यामुळे अनेकांनी लांबच्या प्रवासाकरिता ॲप बेस्ड कॅब सेवा वापरण्याचा निर्णय घेतला. पण परिस्थितीचा गैरफायदा घेत कॅबवाल्याने थेट दिड ते अडीच हजार रुपयांपर्यंत भाडे आकारले.

एरव्ही बक्कळ नफा कमवणाऱ्या ॲप आधारित कॅब सेवांनी किमान नैसर्गिक आपत्तीच्या वेळी ना नफा ना तोटा दरात सेवा द्यावी अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली. वाजवी दरापेक्षा अधिक पैसे आकारून प्रवाशांची लूट करणाऱ्यांवर सरकारनेच नियमावली करून कारवाई करावी, अशीही मागणी नागरिकांनी केली.

# ओला दुष्काळ जाहीर करून हेक्टरची मर्यादा न लावता १००% नुकसान भरपाई द्या : तुपकर

## रविकांत तुपकरांनी सोमठाणा, शिंदीसह इतर गावांमध्ये केली नुकसानीची पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात पावसाने कहर केला आहे. विशेषतः मेहकर, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, लोणार, चिखली या तालुक्यांमध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आहे. या अतिवृष्टीने शेतजमिनीचे,पिकांचे, विहिरींचे, अनेकांच्या घरांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने पंचनाम्याचा गोंधळ न घालता शेतकऱ्यांना सरसकट व विनाअट १००% नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी केली आहे. तुपकर यांनी आज २० ऑगस्ट रोजी सिंदखेडराजा व चिखली तालुक्यातील गावांमध्ये नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला.

आधीच सुलतानी संकटात असलेल्या शेतकऱ्यांना आता अस्मानी संकटाचा देखील मोठा सामना करावा लागत आहे.





शेतकऱ्यांसमोर एका मागून एक संकटांची मालिका सुरूच आहे. गेल्या तीन दिवसांपासून सर्वत्र मुसळधार पाऊस सुरू आहे.

मेहकर, लोणार या दोन तालुक्यांना अतिवृष्टीने अक्षरशः धुवून काढल्यानंतर आता सिंदखेड राजा, देऊळगाव राजा आणि चिखली या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीने कहर केला आहे. नदी नाल्यांना प्रचंड असा पूर येऊन नद्यांचे पाणी शेतांमध्ये तसेच गावांमध्ये शिरल्याने प्रचंड असे नुकसान झाले आहे. शेकडो हेक्टरवरील शेतजमिनी खरडून गेल्या, उभी पिके पावसात वाहून गेली, अनेकांच्या विहिरी खचल्या, शेतातील गोठे पडले, पुरात वाहून गेल्याने अनेक जनावरे दगावली तर काही गावांमध्ये पाणी घुसल्याने अनेक घरांची पडझड झाली, अन्नधान्य व इतर साहित्य वाहून गेले तर अनेकांचे संसार उघड्यावर आले. या अतिवृष्टीने प्रचंड असे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सिंदखेडराजा व चिखली तालुक्यातील विविध गावांमध्ये नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला. सिंदखेड राजा तालुक्यातील शिंदी गावात पावसाने मोठा कहर केला. या गावातील २६ घरांचे मोठे नुकसान झाले आहे. या गावात देखील रविकांत तुपकर यांनी भेट देऊन पाहणी केली. तसेच चिखली तालुक्यातील सोमठाणा यासह इतर गावांमध्ये देखील रविकांत तुपकर यांनी प्रत्यक्ष जाऊन नुकसानीची पाहणी करत शेतकऱ्यांची संवाद साधला व त्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्याचे आश्वासन दिले. शेतकऱ्यांची बिकट अवस्था पाहता शासनाने शेतकऱ्यांप्रती आपुलकी आणि सहानुभूती दाखवून त्यांना नुकसान भरपाई व थेट मदत देण्याची नितांत गरज आहे. गेल्या वर्षी शेतमालाला भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांना कर्ज काढून, उसनवार करून पेरणी करावी लागली. त्यातच हुमणी अळीने सोयाबीनचे आधीच मोठे नुकसान केलेले आहे, त्यात आता अधिवृष्टीने कहर करून प्रचंड असे मोठे नुकसान केले आहे. शासनाने आता पंचनामांचा गोंधळ न घालता बुलढाणा जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना विनाअट व सरसकट नुकसान भरपाई आणि मदत त्यांच्या खाती जमा करावी, अशी आग्रही मागणी रविकांत तुपकर यांनी केली आहे, अन्यथा मोठे आंदोलन उभे करू असा इशाराही तुपकर यांनी दिला आहे.

# तर ३१ व्या दिवशी पदावरून काढून टाकणार! पीएम, सीएम ते मंत्र्यांसाठी नवा कायदा; केजरीवाल पदावर असताना अटकेत जाणारे पहिले सीएम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** गंभीर गुन्हेगारी प्रकरणात अटक झाल्यास पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री किंवा मंत्र्याला पदावरून काढून टाकण्यासाठी केंद्र सरकार कायदा करणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज (२० ऑगस्ट) संसदेत यासाठी तीन विधेयके सादर करतील. या विधेयकांमध्ये अशी तरतूद आहे की जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा मंत्र्याला अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये अटक झाली, ज्यामुळे किमान पाच वर्षांचा तुरुंगवास होऊ शकतो आणि त्यांना सलग ३० दिवस कोठडीत ठेवले गेले, तर ३१ व्या दिवशी त्यांना पदावरून काढून टाकले जाईल. ही विधेयके आहेत, केंद्रशासित प्रदेश सरकार (सुधारणा) विधेयक २०२५, १३० वी घटनादुरुस्ती विधेयक २०२५ आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना (सुधारणा) विधेयक २०२५. ही तीन विधेयके संसदेच्या संयुक्त समितीकडे पाठवण्यासाठी अमित शाह लोकसभेत प्रस्तावही मांडतील.

केजरीवाल पदावर असताना अटक झालेले पहिले मुख्यमंत्री

दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांनी ६ महिने कोठडी आणि तुरुंगात राहिल्यानंतर आपल्या पदाचा राजीनामा दिला नाही आणि तामिळनाडूचे मंत्री व्ही. सेंथिल बालाजी यांनी २४१ दिवस कोठडी आणि तुरुंगात राहिल्यानंतर राजीनामा दिला नाही. केजरीवाल हे पदावर असताना अटक झालेले पहिले मुख्यमंत्री होते.

आता तिन्ही विधेयकांबद्दल जाणून घ्या

१. केंद्रशासित प्रदेश सरकार (सुधारणा) विधेयक २०२५

केंद्र सरकारच्या मते, सध्या केंद्रशासित प्रदेशांमध्ये केंद्रशासित प्रदेश कायदा, १९६३ अंतर्गत गंभीर गुन्हेगारी आरोपांमुळे अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना काढून टाकण्याची तरतूद नाही. म्हणून, अशा प्रकरणांमध्ये मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना काढून टाकण्यासाठी कायदेशीर चौकट तयार करण्यासाठी केंद्रशासित प्रदेश कायदा, १९६३ च्या कलम ४५ मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

२. १३० वे संविधान दुरुस्ती विधेयक २०२५

केंद्राने या विधेयकाबद्दल म्हटले आहे की गंभीर गुन्हेगारी आरोपांमुळे अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मंत्र्याला काढून टाकण्याची संविधानात कोणतीही तरतूद नाही. म्हणून, अशा प्रकरणांमध्ये, पंतप्रधान किंवा केंद्रीय मंत्रिमंडळातील कोणत्याही मंत्र्यांना आणि राज्यांच्या किंवा राष्ट्रीय राजधानी प्रदेशाच्या मंत्रिमंडळातील कोणत्याही मंत्र्यांना किंवा मुख्यमंत्री किंवा कोणत्याही मंत्र्यांना काढून टाकण्यासाठी कायदेशीर चौकट तयार करण्यासाठी संविधानाच्या कलम ७५, १६४ आणि २३९अअ मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

३. जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन (सुधारणा) विधेयक २०२५

जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन कायदा, २०१९अंतर्गत, गंभीर गुन्हेगारी आरोपांमुळे अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना काढून टाकण्याची कोणतीही तरतूद नाही. जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन कायदा, २०१९ च्या कलम ५४ मध्ये सुधारणा केल्यानंतर, गंभीर गुन्हेगारी प्रकरणात अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना ३० दिवसांच्या आत काढून टाकण्याची तरतूद असेल.

ऑनलाइन गेमिंगवर बंदी घालणारे विधेयक देखील सादर केले जाईल

केंद्र सरकार आज लोकसभेत ऑनलाइन गेमिंगवर बंदी घालणारे विधेयक देखील सादर करू शकते. मंगळवारी मंत्रिमंडळाने ऑनलाइन गेमिंग विधेयकाला मान्यता दिली आहे. याम ध्ये, ऑनलाइन पैसे गेमिंग, जाहिराती, खेळांना प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीला दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा १ कोटी रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्हीही होऊ शकतात.

केजरीवाल यांनी अटकेच्या ६ महिन्यांनंतरही राजीनामा दिला नाही

दुसरीकडे, केंद्र सरकारचा असा विश्वास आहे की ही तीन विधेयके लोकशाही आणि सुशासनाची विश्वासार्हता मजबूत करतील. आतापर्यंत, संविधानानुसार, केवळ दोषी ठरलेल्या लोकप्रतिनिधींनाच पदावरून काढून टाकता येते. विद्यमान कायद्यांमध्ये संवैधानिक पदांवर असलेल्या नेत्यांना काढून टाकण्याची स्पष्ट तरतूद नाही. याबाबत कायदेशीर आणि राजकीय वाद आहेत. दिल्लीचे तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य धोरण प्रकरणात ईडीने अटक केल्यानंतरही ते पदावर होते. त्यांनी जामिनानंतर राजीनामा दिला.

सेंथिल बालाजी २४१ दिवस तुरुंगात

तामिळनाडूचे मंत्री सेंथिल बालाजी हे २४१ दिवस तुरुंगात असताना मंत्री होते. मेट्रोपॉलिटन ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (एमटीसी) मध्ये नोकरीसाठी पैसे देण्याच्या घोटाळ्याच्या आरोपाखाली मनी लाँड्रिंग प्रकरणात जून २०२३ मध्ये अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) बालाजीला अटक केली होती. त्यानंतरही ते १३ फेब्रुवारी २०२४ पर्यंत पदावर राहिले. त्यांच्या अटकेपूर्वी ते वीज, उत्पादन शुल्क आणि दारूबंदी विभाग सांभाळत होते. अटकेनंतर मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी त्यांना ''खाते नसलेले मंत्री'' म्हणून ठेवले आणि त्यांचे विभाग इतर सहकाऱ्यांना सोपवले.

### चिंतेत भर! पालघरमध्ये मासेमारीसाठी गेलेल्या ९ बोटी अद्याप परतल्या नाहीत

**पालघर /प्रतिनिधी:** मागील ४८ तासांपासून महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांना आणि प्रामुख्यानं समुद्रकिनारी भागांना पावसानं झोडपलं असून, पुढच्या २४ तासांसाठीसुद्धा या भागांसाठी अतिदक्षतेचा इशारा जारी करण्यात आला आहे. पालघर, रायगड, रत्नागिरीचाही यामध्ये समावेश असून, आता पालघर जिल्ह्यातून चिंतेत भर टाकणारं वृत्त नुकतंच समोर आलं आहे.

मासेमारीसाठी गेलेल्या ९ बोटी अद्याप परतल्या नाहीत

उपलब्ध माहितीनुसार पालघर जिल्ह्यातील मासेमारीसाठी गेलेल्या ९ बोटी अद्याप परतल्या नाहीत. तर, वसईतील ३ बोटींशी अद्यापही संपर्क होऊ शकलेला नाही. त्यामुळं स्थानिक मासेम ारांमध्ये प्रचंड भीती आणि चिंतेचं वातावरण पाहायला मिळत आहे.

पालघर जिल्यातील सातपाटी बंदरातील ४ बोटी आणि खोचिवडे येथील २ बोटींनी गुजरातच्या जाफराबाद मधील नवा बंदरात घेतला आसरा घेतल्याचं वृत्त आहे. प्राथमिक माहितीनुसार पालघर जिल्ह्यातील खोल समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या एकूण १९ बोटी समुद्रात अडकल्या होत्या. यामधील १३ बोटी वसई, २ खोचिवडे तर ४ सातपाटी बंदरातील बोटी होत्या.

# महारचिकना,खळेगाव परिसरात पुन्हा मुसळधार पाऊस शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान, शेतकरी वर्ग चिंतेत

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महारचिकना :** अंजनी खुर्द महसुल मंडळातील अंजनी खुर्द,महारचिकना खळेगाव खापरखेड ,सोमठाणा, ब्राह्मण चिकना,कारेगाव सह परिसरामध्ये काल रात्री दहा वाजेपासून रिमझिम पावसाला सुरुवात झाली होती. तरी रात्रभर पावसाचा जोर हा कायमच राहिला. आणि आज दिनांक १७ऑगष्ट रोजी सकाळी सहा वाजेपासून ते आठ वाजे दरम्यान परिसरामध्ये मुसळधार पाऊस पडून शेतीचे अतोनात नुकसान झालेले आहे.२६ जून रोजी झालेल्या पावसाने अंजनी खुर्द महसुल




मंडळातील शेतकऱ्यावर पहिलेच दुबार पेरणीचे संकट ओढवले असताना आता सततच्या पावसाने सोयाबीन कापसाच्या मुळ्या सडून पिक पिवळी पडत आहेत पिकांना ह्या पावसाने पुन्हा एकदा जबरदस्त तडाखा बसला आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत आहे. नदीकाठच्या क्षेत्रात पाणी घुसून संपूर्ण पिकाचे नुकसान ह्या आजच्या पावसाने झाले आहे



# मेहकरात रेकॉर्डब्रेक भव्य रोजगार मेळावा

## ➤ ४३०० तरुणांची नोंदणी ५१ कंपन्यांचा सहभाग ११२५ उमेदवारांना थेट नियुक्ती

## ➤ आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त उत्कर्ष फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम







**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी:** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त उत्कर्ष फाऊंडेशनच्या वतीने मेहकर येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रोजगार मेळाव्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

या रोजगार मेळाव्यात ३५०० तरुणांनी ऑनलाईन नोंदणी तर ८०० बेरोजगार तरुणांनी प्रत्यक्ष नोंदणी केली. एकूण ४३०० तरुणांनी रोजगारासाठी अर्ज केले.

रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या तरुणांपैकी १८०० उमेदवारांची शॉर्टलिस्टिंग झाली. त्यापैकी ११२५ उमेदवारांना थेट नियुक्तीपत्रे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. या सोहळ्यात उमेदवारांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद झळकत होता.

यावेळी आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की "ज्यांना आज तात्काळ रोजगार मिळाला नाही, त्यांना विविध कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत घडवून योग्य नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील. परिसरातील प्रत्येक तरुणाला रोजगार मिळवून देणे हे आमचे ध्येय आहे."

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसाच्या शृंखलेनिमित्त आणि शहर प्रमुख किशोर गारोळे यांच्या पुढाकाराने मेहकर येथे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रा. विठ्ठल कांगणे (परभणी) यांचे प्रबोधनात्मक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.**

या रोजगार मेळाव्यात ५१ नामांकित कंपन्या व विविध कार्यालयांचा सहभाग होता. आयटी, अभियांत्रिकी, औद्योगिक, बँकिंग, विक्री, सेवा आदी क्षेत्रांमध्ये हजारो संधी उपलब्ध करून दिल्यामुळे तरुणाईला उज्ज्वल भविष्याची नवी दिशा मिळाली.

रोजगार मेळाव्याच्या या भव्य सोहळ्यास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, काँग्रेसचे राज्य सरचिटणीस श्याम उमाळकर, राज्य उपाध्यक्ष लक्ष्मणदादा घुमरे, सह संपर्कप्रमुख छगनदादा मेहेत्रे, काँग्रेसचे ॲड. अनंत वानखेडे, उपजिल्हाप्रमुख प्रा. आशिष रहाटे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष दत्ता घनवट, उपतालुकाप्रमुख रमेश देशमुख, मेहकर शहर प्रमुख किशोर गारोळे, माजी उपसभापती सतीश ताजने,गंगाधर खरात, विठ्ठल चव्हाण, भास्कर गवई, तेजराव घायाळ, गजानन मोरे, युवा सेना तालुका अधिकारी ॲड. आकाश घोडे, जिवन घायाळ, अमोल बोरे, प्रा. गजानन खरात, सागर पाटील, लोणार महिला आघाडी तालुका अध्यक्ष तारामती जायभाये, आरती दीक्षित, नगमा गवळी, महिला आघाडी शहर संघटक पौर्णिमा गवई, संजिवनी वाघ, आरती देशमुख, अनिता खरात, श्याम पाटील, गजानन राठोड, पंडीत बापू देशमुख, ॲड. संदीप गवई आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली.

या रोजगार मेळाव्याच्या यशस्वितेसाठी गोपाल गायकवाड, महेश गायकवाड, शुभम पानखेडे, अमोल मोरे, राजेश्वर गायकवाड (मॅनेजर, लेंड अ हॅण्ड इंडिया), प्रकाश पाटील (प्लेसमेंट ऑफिसर), मिनाक्षी अटकुलवार, थेवेश गुजरे, मिलिंद भैसारे, अंकित देशमुख, ऋतुंबरा लोगडे, ईश्वर मुंगले यांचे परिश्रम विशेष उल्लेखनीय ठरले.

प्रास्ताविक शहर प्रमुख किशोर गारोळे यांनी केले, सूत्रसंचालन निवेदक अजीम नवाज राही यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रकाश पाटील यांनी केले.

## विविध वृत्त...

### जिल्हाधिकारी कार्यालयात 'सद्भावना दिवस' साजरा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्हाधिकारी कार्यालयात आज 'सद्भावना दिवस' साजरा करण्यात आला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंतीनिमीत्त देशभर सद्भावना दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या औचित्याने आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांना सद्भावना दिवसाची शपथ दिली. यावेळी अधिकारी -कर्मचारी उपस्थित होते.

### राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**बुलढाणा/प्रतिनिधी:** हॉकीचे जादुगर स्व.मेजर ध्यानचंद यांच्या जन्म दिवसानिमित्त संपुर्ण भारतात २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधुन खेळाडूंचा सत्कार,खेळाचे प्रात्यक्षिक, विविध क्रीडा स्पर्ध व कार्यक्रमाचे आयोजन दि. २९ ते ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत होणार आहे.

महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणामार्फत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार, फुटबॉल, हँडबॉल प्रात्यक्षिक सामना, लाठी व काठी प्रात्यक्षिक, जिल्हा स्तरीय वुशू स्पर्धा व विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयात साजरा करण्यात येणार आहे. तसेच मेजर ध्यानचंद यांचे प्रतिमा पुजन, त्यांच्या जीवनावर व्याख्यान, मान्यवरांचे खेळाडूंना मार्गदर्शन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन होणार आहे.

सदर कार्यक्रमामध्ये सन १ ऑगस्ट २०२४ ते ३० जुलै २०२५ मध्ये शालेय व अधिकृत एकविध खेळ संघटनेव्दारा आयोजित अधिकृत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये प्राविण्य तथा सहभाग घेतलेल्या खेळाडूंनी आपल्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरुन रोड, बुलढाणा येथे दि.२५ ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत. जेणेकरुन राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे वतीने प्रमाणपत्र व मेडल देवुन सत्कार करण्यात येईल. तरी दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता गुरुकुल इंग्लिश) स्कूल , धाड रोड, बुलढाणा येथे उपस्थित राहावे. नमूद केलेल्या तारखेच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये प्राविण्य तथा सहभाग घेतलेल्या खेळाडूंनी प्रमाणपत्र कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करावेत. अंतिम तारखे नंतर कोणत्याही खेळाडूंचे प्रमाणपत्र स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी, जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी कळविले आहे.

## एसटी महामंडळाचा उपक्रम; प्रवाश्यांच्या समस्या निराकरणासाठी प्रत्येक बुधवारी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिन्याच्या बुधवारी सकाळी १० ते २ या वेळेत "प्रवासी राजा दिन" व दुपारी ३ ते ५ या वेळेत "कामगार पालक दिन"आयोजित करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने सप्टेंबर व ऑक्टोंबर महिन्यासाठी वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाचे कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सांयकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तात्काळ निराकरण करतील.

बुलडाणा विभागातील चिखली आगार येथे बुधवार दि. ३ सप्टेंबर, खामगाव आगार येथे बुधवार दि. १० सप्टेंबर, मेहकर आगार येथे बुधवार दि. १७ सप्टेंबर, मलकापुर येथे बुधवार दि. २४ सप्टेंबर, व जळगाव जामोद येथे दि. १ ऑक्टोबर, शेगाव ८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

## डोळे उघडण्यापूर्वीच मिटले, पुराच्या पाण्यात वेळेत उपचार न झाल्याने नवजात बालकाचा मृत्यू; आरोग्य केंद्रातील ड्रायव्हर, डॉक्टर ठरले बाळाच्या आईसाठी देवदूत

**कोल्हापूर /प्रतिनिधी:** कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असतानाच नवजात बालकाला डोळे उघडण्यापूर्वीच डोळे मिटावे लागले. नवजात बालकाचा मृत्यू झाल्याने दु:खाची छाया पसरली असली तरी, आईला वाचविण्यासाठी जीवाची पर्वा न करता प्रयत्न करणारे १०८ रुग्णवाहिकेतील डॉ. स्वप्नील तमखाने आणि चालक सतीश कांबळे हे मात्र देवदूत ठरले. त्यामुळे नवजात बालकाच्या आईवर सीपीआरमध्ये उपचार सुरु आहेत. हा हृदयद्रावक प्रसंग मंगळवारी (१९ ऑगस्ट) घडला. बोरबेट (ता.गगनबावडा) येथील कल्पना आनंदा डुकरे (वय ३३ वर्षे) या गर्भवती महिलेवर कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

बाळाच्या आईचा जीव वाचवण्यासाठी संघर्ष

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी गगनबावडा तालुक्यात जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. त्यामुळे कुंभी नदीच्या पुराचे पाणी कोल्हापूर गगनबावडा मार्गावर ठिकठिकाणी सखल भागात आले. मंगळवारी सकाळी बोरबेट येथील गर्भवती महिला कल्पनाला प्रसुतीच्या वेदना सुरु झाल्या. त्यांच्या कुटुंबियांनी त्यांना गारीवडे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या गाडीतून गगनबावडा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले, पण पुढील उपचारासाठी तिला रुग्णवाहिकेतून कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देण्यात आला. कोल्हापूर येथील दवाखान्यात नेताना खोकुर्लेपैकी पडवळवाडी येथे वाटेतच तिची १०२ रुग्णवाहिकेमध्ये प्रसुती झाली. सातव्या महिन्यातच अवेळी प्रसुती झाल्याने व बाळाची योग्य वाढ नसल्याने नवजात बालकाचा मृत्यू झाल्याचे तालुका आरोग्य विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

## सण-उत्सव एकोप्याने साजरे करा : जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

### आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची सभा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान गणेशोत्सव आणि ५ सप्टेंबर रोजी ईद ए मिलाद सण साजरा करण्यात येणार आहे. हे सण राष्ट्रीय उत्सव समजून एकोप्याने साजरे करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आज केले.

आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची सभा जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन सभागृहात पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. या सभेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, पोलीस उप अधीक्षक अमोल गायकवाड, राज्य उत्पादन शुल्काचे अधीक्षक डॉ. पराग नवलकर, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी, शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील पुढे म्हणाले, जिल्ह्यात गणेशोत्सव, ईद -ए-मिलाद यासह आगामी काळातील सण, उत्सव 'हा आपला सण' ही एकात्मतेची भावना ठेवून साजरे करावेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी परस्परांप्रती एकतेची भावना ठेवावी. भरकटलेल्या तरुणांचे प्रबोधन करण्याची गरज असून समाजातील प्रतिष्ठीत नागरिकांनी पुढाकार घेवून तरुणांना मार्गदर्शन करावे. समाजमाध्यमांचा गैरवापर टाळावा. सण, उत्सवात कोणतेही विघ्न येणार नाही, ही जबाबदारी समजून समाजबांधवांनी योगदान द्यावे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर वाद-विवाद, अफवांना बळी पडू नये. सण, उत्सवाच्या काळात दारुबाबत प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले.



पोलीस अधीक्षक निलेश तांबे म्हणाले की, गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद आनंदाने साजरा करावा. या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्याची दक्षता घेण्यात येईल. सण, उत्सवाच्या दरम्यान समाजमाध्यमांवर अपप्रचार किंवा शांतता भंग करणारे आक्षेपार्ह संदेश, मजकूर रोखणे ही आपली जबाबदारी आहे. शांतता समितीच्या सदस्यांनी देखील यांची दक्षता घ्यावी. यासाठी आतापासूनच अंमलबजावणी सुरु करावी. तरुण मंडळींना योग्य मार्ग लावणे हे आपले काम असून त्यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे. सणे, उत्सवात प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे गरजेचे असून त्यानुसार कार्यवाही केली जाईल, असेही पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी यावेळी सांगितले.

शांतता समितीच्या सभेत जिल्ह्याच्या विविध भागातून उपस्थित झालेल्या शांतता समितीच्या सदस्यांनी सोई-सुविधांबाबत सूचना मांडल्या. तसेच गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद या सण उत्सवात प्रशासनाच्या सोबत राहून एकोप्याने व शांततेने सण साजरे करण्यात येईल. या दरम्यान कोणत्याही प्रकारचे गाल-बोट लागणार नाही याची दक्षता घेण्यात येईल, अशी भावना शांतता समितीच्या सदस्यांनी व्यक्त केली.

बुलढाणा जिल्ह्यात यावर्षी शहरी आणि ग्रामीण भागात एकूण १३८५ संभाव्य सार्वजनिक गणेश मंडळांची स्थापना करण्यात येणार आहे. त्यामध्ये शहरी भागात ४७० ग्रामीण भागात ९२५ गणेश मंडळ स्थापन करण्यात येणार आहे. यापैकी ३०७ गावात 'एक गाव, एक गणपती' ही मोहिम राबविण्यात येणार असल्याची माहिती पोलीस उप अधीक्षक अमोल गायकवाड यांनी सभेच्या प्रास्ताविकात दिली.

या सभेनंतर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी श्रीगणेशोत्सव समन्वय समितीची बैठक घेवून अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवश्यक निर्देश देवून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.